पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/ १९१/१५
पुणे १ दिनांक :- २०/६/२०१५

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे जयवंत पब्लिक स्कुल,**
**उरुळीदेवाची हांडेवाडी रोड, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे.**

विषयः- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र २४) दिनांक २ जुलै २०१३.
२) शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएस-२,मंत्रालय, मुंबई ३२ दि. २६ फेब्रुवारी २०१४
३) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा मान्यता आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंशाळा/ मान्यता/ पुवि/ २०१४/१०९१५/१८, दि. १७ मे २०१४

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता **खालील अटी व शर्तींवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे मुंबई पुणे बायपास हायवे, ताथवडे, पुणे** | जयवंत पब्लिक स्कुल, उरुळीदेवाची, ता. हवेली, जि.पुणे (सीबीएसई) | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | सन २०१४-१५ |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये सन २०१५-१६ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१
५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली.

JSPM Corporate Offic
Inward No.-56075 Date.- 01/4/2016
Institute Name:- JPS Campus

R PAN

# पुणे जिल्हा परिषद , पुणे


शिक्षण विभाग (प्राथमिक)

यशवंतराव चव्हाण भवन, १ वेलस्ली रोड कॅम्प, पुणे ४११ ००१

ई मेल punezpprivate@gmail.com वेबसाईट https: / /punezp.mkcl.org


जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा१/१८५९/ 305 /२०२३- 24 दिनांक ०३/११/२०२३ 12/01/2024

प्रति,

मुख्याध्यापक,

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

जयवंत पब्लीक स्कुल,

स.नं.२७/७, उरुळी देवाची,

ता. हवेली, जि.पुणे ४१२ ३०८

विषय :- प्रथम मान्यतेमध्ये दुरुस्ती करणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील जा.क्र. JSPM'S/JPS/ADM/2023-24/5220, दिनांक ३०/१०/२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपण शिक्षण विभाग (प्राथमिक), जि.प.पुणे या कार्यालयाकडील जा. क्र. जि.प.शिक्षण /प्राथ /खाप्राशा/ स्वयंअशाळा/ १९१/ १५, दिनांक २०/०६/२०१५ अन्वये दिलेल्या प्रथम मान्यता प्रमाणपत्रातील मान्यता वर्ग **प्राथमिक ते उच्च माध्यमिक** ऐवजी दुरुस्त करुन **१ ली ते ८ वी** असे नमुद करुन मान्यता देणेबाबत विनंती केली आहे.

तथापि आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४/१०९१५/१८, दिनांक १७ मे २०१४ अन्वये दिलेल्या मान्यता आदेशामध्ये **प्राथमिक ते उच्च माध्यमिक** असे नमुद असल्याने सदर बाबत इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी असा बदल करणेची आवश्यकता नाही.

सबब आपला वरील प्रमाणे प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यांत येत आहे.

(संध्या गायकवाड)

शिक्षणाधिकारी प्राथमिक

पुणे जिल्हा परिषद पुणे

पुणे जिल्हा परिषद पुणे

माध्यमिक शिक्षण विभाग

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत) सामवार पेठ,पुणे ११

जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ ९८०३ /२०२४

दिनांक :- २०/१/२०२४

परवानगी वर्ष २३- २४
परवानगी प्रकार - दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष २०२३-२०२४

**स्वयंअर्थसहायित तत्वावरील परवानगी शाळा**

**प्रथम मान्यता**

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव,जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ,पुणे मुंबई पुणे बायपास हायवे,ताथवडे,पुणे

२. मुख्याध्यापक, जयवंत पब्लिक स्कुल,उरुळीदेवाची , ता.हवेली,जि.पुणे

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत ,इ.९ वी १० वी**

संदर्भ-१.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२.
२.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एस.एम-२ दि.२६/२/२०१४
३.शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.शिउस/प्राथ-२/मान्यता/पुवि/२०१४/१०९१५/१८ दि.१७/५/२०२३
४.शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.पुणे यांचेकडिल प्रथम मान्यता आदेश जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/खाप्रशा१/ १९१/२०१५ दि.२०/६/२०१५
५.संबधित शाळेकडील प्रस्ताव **दि. ७/११/२०२३**
६.उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग यांचा तपासणी अहवाल दिनांक २२/१२/२०२३

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र. २ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन /परिपत्रक क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/ एस.एम-२ दि.२६/२/२०१४ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ,पुणे मुंबई पुणे बायपास हायवे,ताथवडे,पुणे | जयवंत पब्लिक स्कुल, उरुळीदेवाची ता.हवेली,जि.पुणे<br>युडायस नंबर २७२५०५०७८०५ | इंग्रजी | सी.बी.एस.ई | इ.. ९ वी १० वी च्या वर्गास प्रथम मान्यता | २०२३-२०२४ पासून |

**अटी व शर्ती**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३.संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल

४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.

५.सर्व संबधिताच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्वावरील नवीन दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६.जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

७.SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर( शाळा, विदयार्थी शिक्षक इत्यादी बाबतची ) माहिती भरणे व ती वेळोवेळी अदयवात करणे आवश्यक राहील.

८.शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अदयावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावत.

९.वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विदयार्थ्यांना प्रवेश दयावेत पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०.शाळेत पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शसनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११.शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२.व्यवस्थापकीय संस्था ही विहित केलेले नियम ,मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील येईल.

१३.शासनाचे वतीने एखादया अधिका-यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४.याव्दारे ज्या वर्गाना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५.शालेय शुल्क निश्चित करताना महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन )अधिनियम -२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्थाकॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध)अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे

१६.शाळा बंद करणे शासनाने किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्वावर स्थापन केलेली शाळा बंद करता येणार नाही.

१७.एखादया शाळेने त्यांना लागू असलेल्या कायदयातील कोणत्याही तरतूदीचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास विदयार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहिन शैक्षणिक कामगिरी केल्यास शाळेची मान्यता /परवानगी काढून घेण्यात येईल.

१८.जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबीची पुर्तता करावी.

a) शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.(Fire Audit)
b) शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
c) शाळेच्या संबधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
d) सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.
e) प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.(Structural Audit)
f) ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९.संदर्भ क्र.२ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एस.एम-२ दि.२६/२/२०१४ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०.सदरची मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षाकरिता लागू असेल त्यानंतर कायम मान्यता घेण्यात यावी .शाळेची प्रगती विचारात घेउन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल

२१.पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने या आदेशातील व इतर कायदयाने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
१.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे
२.विभागीय सचिव पुणे विभागीय शिक्षण मंडळ शिवाजीनगर पुणे

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

प्रथम मान्यता २०२४-२५

माध्यम : इंग्रजी

स्वयंअर्थ सहाय्यित शाळा

जा.क.शिउसं/उमाशि-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/ई-ऑफिस
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

प्रति

प्राचार्य, जयवंत पब्लिक स्कूल, उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे

**विषय - सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम मान्यता देण्याबाबत....**

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ दि.२६.०२.२०१४

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउस/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४/१०९१५/१८ दि.१७.०५.२०१४

४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांचे जा.क्र.९७१५ पुणे दि.१८.१०.२०२४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस २०१८-१९ वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ क्रमांक २ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ४ च्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णया नुसार खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे-मुंबई-पुणे बायपास हायवे ताथवडे, पुणे | जयवंत पब्लिक स्कूल, उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | सी.बी.एस.ई. | उच्च माध्यमिक इ.११वी व १२ वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित | २०२४-२५ |

अटी व शर्ती-

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी

३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी

४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी

५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही

७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल

८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून असेल.

९ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र मराठी/इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

११ महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही

१२ महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-Dise मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१३ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील

१४ सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जुन २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छान्नी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

१५ शासन परिपत्रक क्र. तपासू-२०२४/प्र.क्र.२४३/एस.डी.-४ दि.२४.०९.२०२४ अन्वये शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेबाबतचे सर्व बार्बीची पुर्तता करणे आवश्यक राहील

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.
शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

Signed by Ganpat
Shankarrao More
Date: 10-07-2025 14:10:10
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१ **मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**

२ **मा. आयुक्त,शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे- १**

३ **मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**

१ **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**

२ **जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे- मुंबई-पुणे बायपास हायवे, ताथवडे, पुणे**